# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

व्यवस्थापन परिषदेची बैठक दिनांक २५/०३/२०२१ रोजी आयोजित केली आहे. कामकाजामध्ये आयसीटीचा वापर वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सदर बैठकांची कार्यक्रमपत्रिका आणि कार्यवृत्तांत ONLINE पद्धतीने करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये सादर करण्यात येणारे विषय हे **युनिकोड फाँट**मध्ये असावेत. त्यास अनुसरून कळविण्यात येते की, व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीसाठी पाठविण्यात येणारे विषय हे युनिकोड फाँटमध्येच तयार करून व त्यास आवश्यक प्रशासकीय मान्यता घेऊन **दि.१५/०३/२०२१ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत** सभा विभागास पाठविण्यात यावेत. तसेच विषयाची सॉफ्ट कॉपी वर्ड फाईलमध्ये व काही जोडपत्रे (Enclosures) असतील तर त्यांची एक पीडीएफ फाईल करून meeting@unishivaji.ac.in या ई-मेल आयडीवर मेल करण्यात यावीत.

आदेशान्वये कळविण्यात येते की, आयत्यावेळचे विषय स्वीकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. तसेच अधिकार मंडळाच्या वतीने मान्यता घेतली असल्यास सदर विषयही त्या त्या सभागृहासमोर कायद्यातील तरतूदीनुसार जातील याची खातरजमा करावी.

उपकुलसचिव

विद्यानगर, कोल्हापूर – ४१६ ००४.
जा.क्र.शिवाजी वि./सभा व निवडणुका/ व्य.प./ ५०
दिनांक : 8 MAR 2021

प्रति,

१) सर्व उपकुलसचिव, सहा.कुलसचिव व प्रशासकीय विभागप्रमुख.
२) स्वीय सहाय्यक - १. मा.कुलगुरू कार्यालय, २. मा.प्र-कुलगुरू कार्यालय,
३. मा.कुलसचिव कार्यालय, ४. मा.वित्त व लेखाधिकारी कार्यालय,
५. मा.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ कार्यालय